

# शहरी तळ्यात फुलले प्राणीजीवन

**Author:** Ashish Kothari
**Illustrator:** Sangeetha Kadur
**Translator:** Siddharth Kelkar

PRATHAM BOOKS
A Book in Every Child's Hand

वाचन पातळी ४



बाहेर मिट्ट काळोख होता आणि घराच्या खिडकीतून बाहेरचं फारसं काहीच दिसत नव्हतं. ज्या संध्याकाळी मी पुण्यातल्या नव्या घरी राहायला आलो, त्याच रात्रीचं हे चित्र. ट्युनिंग नसलेले शेकडो रेडिओ एका वेळी कुरकुरत आहेत, असा भास निर्माण करणारी कर्कश खरखर त्या काळोखातून ऐकू येत होती.

दिवस उजाडला, तसतसं या आवाजाचं रहस्य हळूहळू उलगडायला सुरुवात झाली. माझ्या घराच्या गच्चीतून समोरच दिसणाऱ्या, ओस पडलेल्या दगडांच्या खाणीच्या खड्डयात, चक्क एक तळं तयार झालं होतं. रात्र जागवणाऱ्या निशाचर प्राण्यांचं तेच निवासस्थान असावं.

प्रत्येक ऋतूत बदलणारी या तळ्याची अनेक रूपं मी पुढचं वर्षभर निरखत होतो. उन्हाळ्यात हा परिसर अगदी वैराण होता; पण पाऊस सुरू व्हायचा अवकाश, त्यामध्ये नवी जान आली. जणू एखादा वाद्यवृंद सुरांची बरसात करण्यासाठी केवळ संयोजकाच्या इशाऱ्याकरिताच थांबला होता!

तहानलेल्या मातीवर पडलेल्या पावसाच्या पहिल्या थेंबांनी प्रसन्न मृद्गंध निर्माण केला; पण त्याहीपेक्षा एखाद्या जादूगारालाही जमणार नाही, अशी जादू त्यांनी केली. करड्या जमिनीला हिरवाईनं नटवलं!



थोड्याच दिवसांत पाणगवताची पाती उन्हात न्हाऊन निघू लागली. मरगळलेल्या रोपट्यांनी पुन्हा डोकं वर काढलं. पाणगवताचे तपकिरी करडे तुरे वाऱ्यावर डोलू लागले आणि शेजारच्या झाडांवरची मऊसूत फुलं हवेत तरंगू लागली.





इतर प्राणिमात्रांनीही मग निसर्गाच्या या आविष्कारात आपले रंग भरायला सुरुवात केली. ध्यान लावल्याचा आव आणत फांद्यांवर बसलेले खंड्या पक्षी अचानक झपकन् खाली झेपावत आणि मासे मटकावत. त्याच वेळी सुगरण आणि मुनिया पक्षी घरटी बांधण्यासाठी पाणगवताची लुसलुशीत पाती तोडून नेऊ लागले.





तळ्याकाठच्या उतारावर टिटव्यांची एक जोडी तुरुतुरु धावत होती. तळ्याकाठच्या जमिनीतल्या उथळ खळग्याच्या घरट्यात घातलेल्या त्यांच्या अंड्यांचे त्या रक्षण करीत होत्या की काय? मला तरी असं वाटलं कारण एखादा माणूस त्या खळग्याजवळ येतोय, असं जाणवलं, की टिटव्या कर्कशपणे टिवटिव टिवटिव सुरू करत हवेत झेपावत होत्या.  या टिटव्या त्यांच्या ‘घरट्या’चं रक्षण करत होत्या, असं मला जे वाटलं, ते बरोबरच होतं.

त्या पाण्यामध्ये मोठे खडक आहेत, असं मला वाटत होतं. उन्हात ते चमकायचेही; पण मी दुर्बिणीतून त्यांच्यावर नजर रोखली, तेव्हा मात्र आश्‍चर्याचा धक्काच बसला. ते खडक नव्हते, तर ती चक्क कासवं होती! आणि मग त्यांची पाण्याखालची हालचालही मी न्याहाळली. तिथं आणखी काही कासवं होती. पाण्यातून डोकं वर काढून निवांत पोहत होती. जेमतेम आठवड्यापूर्वी हाच भाग अक्षरश: ओसाड होता. मग आता ही कासवं आली कुठून?

मला एका पुस्तकात संदर्भ मिळाला, की ही फ्लॅपशेल जातीची कासवं उन्हाळाभर जमिनीखाली जाऊन झोपतात आणि तळं पुन्हा पाण्यानं भरण्याची वाट पाहतात. मला तर त्यांचं इतकं कौतुक वाटलं, की त्यांच्या सन्मानार्थ मी त्या तळ्याचं नामकरण ‘फ्लॅपशेल कासवांचं तळं’ असंच करून टाकलं.







अनेक पक्षी त्या कासवांभोवती फिरत होते, पण कासवे मात्र शांतपणे त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत होती. पाणकोंबडी अन्न शोधत होती, तर शिकारी पक्ष्यांच्या भीतीनं वंचक (तळ्यातले बगळे) अतिशय सावधपणे पावलं टाकत उंच गवतातून वाट काढत होते. वर्षाऋतू जसजसा बहरत गेला, तसतशी प्लवांची (बदकाचा प्रकार, स्पॉटबिल्ड डक) जोडीही 'फ्लॅपशेल कासवांच्या तळ्या'वर झेपावून गोगलगायी आणि पाणरोपट्यांवर ताव मारू लागली. हा मेवा संपला, की निसर्गातल्या इतर खादडीवर हात साफ करायला ते मोकळे.







कधीकधी आसमंतात उडत्या कीटकांची गर्दी होई. लाल चतुर, विविधरंगी फुलपाखरं, जवळ गेल्याशिवाय जे दिसतही नाहीत असे नाजूक, निमुळत्या शरीराचे छोटे चतुर असे अनेक प्रकार. या किड्यांचे आणि पक्ष्यांचे आवाज एका वेगळ्याच नादमाधुर्याचा अनुभव देत. रात्रीच्या त्या कर्कश खरखरीपेक्षा ही गंमत वेगळी होती.

मला वाटलं होतं, की या छोट्याशा तळ्यात सस्तन प्राणी नसेल; पण माझा अंदाज साफ चुकला. तळ्याकाठी आलेली लाजरी मुंगसं माझ्या दृष्टीस अनेकदा पडली. एकदा तर तीन पिल्लांसह आख्खं कुटुंबच आलं होतं.



आता जिथं मुंगूस, तिथं साप हवेतच. गवताच्या पात्यांतून वाट काढणारे पाणघोणसही (पाणसापांचा एक प्रकार) माझ्या दृष्टीस पडलेच.





पण मग रात्री येणारा कर्कश आवाज कोणाचा होता?
तर त्याचे निर्माते होते विविध प्रकारचे शेकडो बेडूकदादा!
जोडीदाराला आकर्षित करण्यासाठी तो कर्कश समूहस्वर तेच निर्माण करीत होते.

त्यांना साथ देत होते, गवताच्या पात्याला चिकटून बसलेले रातकिडे,
त्यांना बहुधा जन्मतःच ध्वनीवर्धक मिळालेला असतो!
आपला स्वत:चाच लय-ताल असलेल्या त्यांच्या त्या रात्रगानाचं
रसग्रहण करण्याचं कसब मी लवकरच शिकलो.

रात्रीच्या या वाद्यवृंदात कधीकधी पाहुणे कलाकारही यायचे. माझ्या विजेरीचा प्रकाश पडताच गमतीदार पद्धतीनं मान वर-खाली करणारा पिंगळा आणि रात्रभर चक-चक- चुर्रर असा आवाज करणारा रातवा हे मध्येच कधीतरी तळ्याला भेट देऊन जायचे.





एक दिवस मात्र काळजी वाटावी, अशी गोष्ट घडली. साप किंवा धूर्त चोचीच्या बगळ्यांमुळं मला भीती वाटली, असं तुम्हाला वाटत असेल, तर तसं काही नाही हां! काही लोक आमच्या ‘फ्लॅपशेल कासवांच्या तळ्या’भोवती फिरून कसली तरी पाहणी करू लागले. त्या लोकांनी माझ्या जिवाला घोर लावला. मला माझ्या शेजाऱ्यांकडून समजलं, की ते तळ्यातलं पाणी काढून तिथल्या जागेवर इमारती उभारण्याचं नियोजन करत होते. हे ऐकून मी ठरवलं, हे होऊ द्यायचं नाही. मी आणि माझ्या स्नेह्याने शेजारपाजारच्या काही लहान मुलांना जमवलं. त्यांना याबाबतची कल्पना दिली. तळ्याच्या ठिकाणी इमारत होऊ नये, यासाठी लढायला प्रेरितही केलं. मग आम्ही काही पत्रकारांना बोलावलं.

दुसऱ्याच दिवशी वृत्तपत्रांनी लहान मुलांनी केलेल्या आवाहनाची बातमी छापली. आमच्या वसाहतीतल्या इतर नागरिकांनीही मग काही अधिकाऱ्यांना फोनाफोनी करून हे तळं वाचवायची विनंती केली. काही पर्यावरणवादी संघटनाही यात उतरल्या. शहराच्या महापालिका आयुक्तांनाही ती जागा पाहण्यासाठी बोलावलं. प्रथम त्यांना आमचं म्हणणं पटलं नाही; पण जेव्हा त्यांनी तिथली पावसाची जादू पाहिली, तेव्हा त्यांना जाणवलं, की हे तळं नष्ट होणं म्हणजे खेदाची बाब ठरेल.






आणि अखेर हे प्रयत्न यशस्वी झाले. ‘फ्लॅपशेल कासवांच्या तळ्या’च्या जागी कोणतंही बांधकाम होणार नाही, असं जाहीर करण्यात आलं. या तळ्यातली पावसाची जादू अनुभवणारा मी किती नशीबवान होतो, असा विचार मी केला.



या गजबजलेल्या शहरात हजारो जीवांना अभय देणारं एक छोटं अभयारण्यच जणू इथं उभं होतं. कधीकधी आपल्या परसातच आपल्याला जादू दिसते, ती अशी.



## तळं वाचवा!

तुमच्या घराशेजारी एखादं तळं आहे? तुम्ही त्याभोवतीची विविधता कधी निरखून पाहिली आहे? त्याला प्रदूषणाचा किंवा बांधकामाचा विळखा पडण्याची तर शक्यता नाही ना? जर असेल, तर तुम्ही, तुमचे मित्र, त्यांचे पालक आणि त्यांचे मित्र अशा सगळ्यांना एकत्र करून त्यांना ते तळं वाचवायचं आवाहन कराल?

या जागेवर बांधकाम करू इच्छिणार्‍यांनी जर तुम्हाला विचारलंच, की तुम्हाला ते का वाचवायचं आहे, तर? उत्तर सोपं आहे. सांगा, की पक्षी, प्राणी आणि कीटकांनाही राहायला घर हवं असतं म्हणून!



विविध प्राणी-पक्ष्यांना आसरा देणारी अशी हजारो तळी शहरा-शहरांतून असतील, तर किती भारी होईल ना? जगातल्या वेगवेगळ्या भागांतल्या मुलांना, पालकांना तुमच्या कम्प्युटरच्या जाळ्यानं तुम्ही जोडलंत किंवा पोस्टानं पत्रं पाठवलीत आणि तुम्ही या तळ्यांमध्ये काय पाह्यलंत, ते कसं वाचवलंत, याच्या गोष्टी, फोटो शेअर केलेत तर?



storyweaver PRATHAM BOOKS

This book was made possible by Pratham Books' StoryWeaver platform. Content under Creative Commons licenses can be downloaded, translated and can even be used to create new stories - provided you give appropriate credit, and indicate if changes were made. To know more about this, and the full terms of use and attribution, please visit the following link.

## Story Attribution:

This story: शहरी तळ्यात फुलले प्राणीजीवन is translated by Siddharth Kelkar . The © for this translation lies with Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Based on Original story: 'Wildlife in a City Pond', by Ashish Kothari . © Pratham Books , 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license.

## Other Credits:

'Shahri Talyaat Fulale Prani Jeevan' has been published on StoryWeaver by Pratham Books. The development of this book has been supported by Parag (Promoting Innovative Publishing in Education), an initiative of Tata Trusts. www.prathambooks.org

## Illustration Attributions:

Cover page: All kinds of animals and insects in a pond and surrounding area enjoying the rain by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 2: A balcony viewed from inside the house, by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 3: Rain drops falling on a water body, by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 4: A bird catching a fish from the pond and flying away by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 5: Some birds sitting on stalks of plants and some hanging by their nests on trees, by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 6: Two birds calling out and protecting their nest, by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 7: Turtles sitting on a rock at the edge of water, by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 8: Ducks, turtles and birds in and around the water body by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 9: Reeds jutting out of a water body with a tree branch above, by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 10: Lots of colourful butterflies flying in a group, by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license.

Disclaimer: https://www.storyweaver.org.in/terms_and_conditions

cc BY

Some rights reserved. This book is CC-BY-4.0 licensed. You can copy, modify, distribute and perform the work, even for commercial purposes, all without asking permission. For full terms of use and attribution, http://creativecommons.org/licenses/by/4.0/

parag
AN INITIATIVE OF TATA TRUSTS

The development of this book has been supported by Parag (Promoting Innovative Publishing in Education), an initiative of Tata Trusts.

PRATHAM BOOKS storyweaver

This book was made possible by Pratham Books' StoryWeaver platform. Content under Creative Commons licenses can be downloaded, translated and can even be used to create new stories - provided you give appropriate credit, and indicate if changes were made. To know more about this, and the full terms of use and attribution, please visit the following link.

## Illustration Attributions:

Page 11: A family of mongooses on a cliff edge by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 12: A family of mongooses at the edge of pond with a snake inside it, by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 13: Toads, frogs and crickets living beside a pond in and near the reeds, by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 14: A little bird sitting on the ground in the corner, by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 15: Two owls on a tree branch and a bird sitting on the ground at night, by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 16: A small patch of land near a water body by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 17: People protesting against construction on a natural space, by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 18: A serene pond in the middle of a residential area, by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 19: A pond surrounded by greenery, by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 20: Turtles and baya weaver birds, by Sangeetha Kadur © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license.

Disclaimer: https://www.storyweaver.org.in/terms_and_conditions

Some rights reserved. This book is CC-BY-4.0 licensed. You can copy, modify, distribute and perform the work, even for commercial purposes, all without asking permission. For full terms of use and attribution, http://creativecommons.org/licenses/by/4.0/

The development of this book has been supported by Parag (Promoting Innovative Publishing in Education), an initiative of Tata Trusts.

# शहरी तळ्यात फुलले प्राणीजीवन

(Marathi)

शहरातल्या पाणथळीच्या जागा या पडीक मानायच्या आणि त्यावर बांधकाम करण्यासाठी डोळा ठेवून राहायचं, ही आजची रीत! खरं तर अशा जागा म्हणजे पर्यावरणाचा तोल सांभाळणारा, जादुई वाटावा असा समृद्ध ठेवा असतो. तो जपायला हवा. ऐन शहरातलं असंच एक तळं आणि त्यातलं प्राणी-पक्षी जीवन याचं प्रसन्न दर्शन घडवणारी ही गोष्ट. एका खऱ्या घडलेल्या प्रसंगावर आधारित!

या पुस्तकाची वाचन पातळी ४ आहे. आत्मविश्वासाने, ओघवते वाचन करणाऱ्या मुलांसाठी.

PRATHAM BOOKS
storyweaver

Pratham Books goes digital to weave a whole new chapter in the realm of multilingual children's stories. Knitting together children, authors, illustrators and publishers. Folding in teachers, and translators. To create a rich fabric of openly licensed multilingual stories for the children of India  and the world. Our unique online platform, StoryWeaver, is a playground where children, parents, teachers and librarians can get creative. Come, start weaving today, and help us get a book in every child's hand!